| | | |
|---|---|---|
| MHKO050056222025 | कौटुंबिक हिंसाचार अर्ज क्र. १४५/२०२५ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश | अनुराधा वाळकुंजे<br>वि.<br>रविंद्र वाळकुंजे व इतर |

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अंतर्गत दाखल केलेल्या मूळ प्रकरणामध्ये अर्जदार अंतरिम पोटगी मागत आहे. (येथुन पुढे सोयीकरीता "सदर कायदा" असे संबोधले आहे). अर्जदार अंतरिम पोटगीशिवाय राहणेसाठी घरभाडे, संरक्षण आदेश इ. मागण्या केल्या आहेत. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी अंतरिम पोटगी व्यतिरिक्त मागितलेल्या मागण्या या प्रकरणामध्ये दोन्ही बाजूचा पुरावा घेतल्यावर गुणदोषावर निर्गमित करण्यात येतील. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी करता विचारात घेण्यात आला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

२. अर्जदार व वि.प. नं.१ हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे रितीरिवाजानुसार व परंपरेनुसार दिनांक ०१/०८/२०१० रोजी इचलकरंजी येथे झाला. साखरपुडा व लग्नाकरिता अर्जदार यांच्या माहेरील लोकांनी रू.१ लाख खर्च ला आहे. तसेच वि.प. यांनी विवाहामध्ये अर्जदार हिला सोन्याचे २.५ तोळयाचे गंठण, सोन्याचे कर्णफुले, १ तोळयाचे मंगळसूत्र इ. दागिने स्त्रीधन घातलेले होते. सदर विवाहासंबंधातून अर्जदार व वि.प.नं. १ यांना राजवर्धन नावाचे अपत्य झाले आहे.

३. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, विवाहानंतर अर्जदार ही सासरी नांदण्यास गेली. वि.प. हे रागीट व दांडगावा करणारे इसम असल्याने सुरवातीपासूनच अर्जदार यांना नजरेच्या धाकात ठेवले होते. वि.प.नं.१ हा अर्जदार हिला पत्नी म्हणून विश्वासात घ्ोवनू वागत नव्हता याबाबत अर्जदार

हिला सतत भिती वाटत होती. दि.०४/०४/२००४ रोजी अर्जदार यांना राजवर्धन नावाचा मुलगा झाला. तरी देखील वि.प. यांच्या वागण्यामध्ये काहीही फरक पडला नाही. वि.प.नं.३ ही अर्जदार हिला घरामध्ये मोलकरणीसारखी वागणूक दत असत, मुलाचे जन्मानंतर वि.प.नं.१ हे अर्जदार हिला कोणताही सन्मान देत नसत. वि.प.नं.१ हा वि.प.नं.२ व ३ शिवाय कोणाचेही ऐकत नव्हता. वि.प. नं.३ हे अर्जदार हिला तुझ्यापेक्षा जास्त श्रीमंती घराण्याचे स्थळ मिळाले असते, तु मला सून म्हणून पसंत नाहीस, माझ्या मुलाला घटस्फोट दे, माझ्या मुलाचे दुसरे लग्न करतो असे म्हणत असत. वि.प. यांना अर्जदार यांनी पुढे शिकण्याची इच्छा असल्याचे सांगितले असता आम्हाला घरात मोलकरीण पाहिजे, तु काय शिकू नको असे वि.प.नं.२ यांनी अर्जदार यांना दरडवले व वि.प.नं.२ च्या सांगण्यावरून वि.प.नं.१यांनी चिडून जावून अर्जदार हिला रात्री मारहाण केली. अर्जदार यांनी शिक्षीका पदासाठी अर्ज केल्यावर तिची एकलव्य ॲकॅडमी येथे तसेच बालाजी पब्लीक स्कूल येथे निवड झाली होती. सदरबाबत वि.प. यांना सांगितले असता माझी मुलगी डिलीव्हरीसाठी माहेरी येणार तु नोकरी करायची माझ्या मुलीची सेवा करायची असे सांगितले व वि.प.नं.१ व २ यांनी अर्जदार हिस मारहाण केली. तसेच अर्जदार ही माहेरी गेली असता तु माहरी का गेलीस, तुझे बाहेर लफडे आहे असे आम्हाला समजले आहे, तु बोलत असतानाचा फोटो आमचेकडे आहे असे म्हणून अर्जदार हिला फोटो दाखवून वि.प.नं.१ ते ३ यांनी अर्जदार हिला प्रचंड मारहाण केली. त्यावेळी वास्तविकपणे अर्जदार ही दवाखान्यामध्ये दाखविण्यासाठी मुलगा व भाऊ असे गेले होते.

४. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, सन २०२० मध्ये वि.प.यांनी अर्जदार हिच्याकडून आम्ही सांगतो तसे स्टँपवर लिहून दे नाहीतर तुझ, तुझ्या वडीलांचे आणि मुलाच काही खरं नाही अशी धमकी देवून जबरदस्तीने स्टँप लिहून घेतला व अर्जदार हिला सही करणेस भाग पाडले. दि.०८/०४/२०२१ रोजी अर्जदार यांनी वि.प. हिला मारहाण करून नेसत्यावस्त्रानिशी घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही

नाईलाजास्तव माहेरी राहत आहे. वि.प.नं.१ यांनी अर्जदार यांचेविरूध्द एच.एम.पी.१६३/२०२३ दाखल केला आहे. अर्जदार हिने गडहिंग्लज येथील न्यायालयात विवाह पुर्नस्थापित होवून मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वि.प. यांनी अर्जदार हिस घरातुन हाकलुन दिल्यापासुन त्यांच्या पोटापाण्याची, कपड्यालत्याची, औषधपाण्याची कसलीही व्यवस्था केली नाही. त्यामुळे, अर्जदार नं.१ ही तिचा स्वतःचा व तिच्या अज्ञान मुलाचा उदरनिर्वाह भागविण्यास असमर्थ आहे. तसेच, अर्जदार हिस उत्पन्नाचे कसलेही साधन नाही. वि.प. नं.१ हा व्यापारी असून त्यापासून त्यास रू.५ लाख उत्पन्न आहे. वि.प.नं.१ व २ यांचे काशिलिंग कन्स्ट्रक्शन या नावाने व्यवसाय असून त्यापासून त्यांना दरमहा रू.६ लाख उत्पन्न मिळते. वि.प.यांचे मालकीच्या इचलकरंजी येथे हातमागाच्या १५ जोडया असून सदर व्यवसायापासून रू.५० हजार इतके उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ व २ यांचा ५० लाख इतक्या रक्कमेचा अलिशान बंगला आहे. तसेच वि.प.नं.१ व २ यांचेकडे चारचाकी, दोन चाकी वाहने, बांधकाम व्यवसायस लागणारे अत्याधुनिक मशिन आहेत. वि.प.नं.२ यांची शेती असून त्यांना वार्षिक ३ लाख इतके उत्पन्न मिळते. वि.प.नं.१वर अर्जदारशिवाय कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे अर्जदाराना प्रत्येकी रू.२० हजार देण्याची ऐपत वि.प. यांची आहे. त्यामुळे, अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेच्या तारखेपासुन दरमहा रक्कम रू.२०,०००/- प्रमाणे तात्पुरती स्वरुपाची पोटगी वि.प. यांचेकडुन मिळावी, अशी विनंती केली आहे.

६. वि.प. वकिल देवून हजर झाले. त्यांनी नि.११ कडे आपले म्हणणे देवून अर्जातील कथने खोटी असल्याचे सांगितले आहे. वि.प. यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी अर्जदार हिचा कधीही शारीरिक व मानसिक छळ केलेला नाही. वि.प. यांच्या वडीलांनी रितीरिवाजाप्रमाणे अर्जदार व वि.प.नं.१ यांचे लग्न करून दिले. अर्जदार ही सुरवातीचे काही महिने व्यवस्थीत नांदली. त्यानंतर किरकोळ कारणावरून वि.प. यांचेसोबत किरकोळ

कारणावरून वाद घालत असत व घरी कोणासही न सांगता वेळी अवेळी माहेरी जाऊन राहू लागल्या. वि.प. हे अर्जदारांचे हट्टापायी वेगळे राहिले. तरीही अर्जदाराच्या वागण्यामध्ये कोणताही बदल झाला नाही. अर्जदार या मुळत: तापट व शिघ्र कोपी आहे. त्यांचा मुलगा राजवर्धन यांचा जन्म झाल्यानंतर अर्जदार ही वि.प. यांचे गैरहजेरीत विनोद कुलकर्णी यांच्याशी बोलत होती. वि.प.नं.१ यांनी अर्जदार हिचा मोबाईल तपासला असता तिने सतत विलोद कुलकर्णी याला फोन केल्याचे निदर्शनास आले. सदरबाबत अर्जदार यांनी तो त्यांच्या कॉलेजमधील मित्र असल्याचे सांगून माफी मागून पुन्हा असे कृत्य करणार नाही असे सांगितले. अर्जदार ही वि.प.नं.१ चे खिशातील रक्कम चोरून स्वत:कडे ठेवत असत. अर्जदार ही वि.प.नं.१ यांचे भाऊबंदाचे घरातील कपडे, मेकअपचे साहित्य इ. वस्तू देखील चोरून आणत होती. अर्जदार हिच्या अशा वागण्यामुळे वि.प. यांना त्यांच्या नातेवाईकांसमोर अपमानित व्हावे लागले. अर्जदार यांनी वि.प.नं.१ यांचे अंगावर धावून जावून २-३ वेळा त्यांची कॉलर पकडून वि.प.नं.१ यांचा गळा धरणेचा प्रयत्न केला होता. अर्जदार विनोदकुमार कुलकर्णी याच्याशी मोबाईलवरून बोलत असल्याचे समजले असता अर्जदार वि.प.नं.२ यांना सदर घटनेबाबत माझे पती व सासरे यांना सांगू नका अन्यथा मी माझा हात कापून घेईन अशी धमकी दिली होती. त्यानंतर अर्जदार हिने कोणताही गैरप्रकार करणार नाही असे दि.०६/११/२०१९ व दि.१२/०६/२०१९ रोजी स्टँपवर लिहून दिलेले आहे. त्यानंतर देखील अर्जदार ही गुप्तपणे सदर कुलकर्णी हिच्याशी संपर्क साधत होती. अर्जदार हिच्या वागण्यामध्ये कोणताही बदल होत नसल्यामुळे वि.प. यांनी अर्जदार हिचे मागणीप्रमाणे मुलासोबत तिचे माहेरी दि.०८/०४/२०२१ रोजी सोडले होते. त्यावेळी अर्जदार यांनी वि.प.नं.१कडे घटस्फोटाची मागणी केली.

७. वि.प. यांचे पुढे असे कथन आहे की, वि.प. यांनी अनेकवेळा मध्यस्थीकरून अर्जदार हिस नांदविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये यश आले नाही. तद्नंतर वि.प. यांनी वकील जी.जे. सावंत यांचेमार्त सहमताने

घटस्फोट होणेबाबत दि.०३/०५/२०२१ रोजी अर्जदार हिस नोटीस पाठविली होती. तद्नंतर वि.प. हे अर्जदार हिचे माहेरी गेले असता अर्जदार ही मुलास माहेरी ठेवून सदर विनोद कुलकर्णी या इसमासोबत राहणेस गेली आहे. त्यामुळे वि.प. हे मुलगा राजवर्धन यास घेवून इचलकरंजी येथे गेले. त्यावेळी पासून तो वि.प. यांच्यासोबत असून त्याचे पालनपोषन ते करीत आहे. अर्जदार हिचे शिक्षण बी.ए. पर्यंत झे असून ती नोकरी करते. अर्जदार यांनी वि.प. यांना संसारसुखापासून वंचित ठेवले आहे. अर्जदार या त्यांचा व मुलाचा त्याग करून त्रयस्थ इसम विनोद कुलकर्णी यांचेसोबत राहत आहे. वि.प. यांचा मुलगा राजवर्धन याचा अर्जदार यास दिल्यास त्याचे भवितव्य अंधारात येणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेची विनंती केली राजी.

८. अर्जदारचे वकील व वि.प. यांचे वकीलांचा युक्तिवाद विचारात घेतला त्यानुसार अंतरिम अर्जाच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास कोणाला व किती? | : | अंशतः होकारार्थी. अर्जदार हिस रु.३०००/- दरमहा |
| २. | काय आदेश? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ बाबत -

९. सदर कायद्यातील तरतुदीनुसार शपथपत्रावर आधारुन अर्जदार अंतरिम दाद मागू शकते. वि.प.विरुद्ध अनेक कथने तिने सदर अर्जात आणि त्याच्या पृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या शपथपत्रात केली आहेत. अनुक्रमे निशाणी क्र.१३ व १६ लगतचे अर्जदार व वि.प. यांच्या सर्वोच्च न्यायालयाचे रजनेश

वि. नेहा या न्यायनिवाडाप्राणे ऐपतिचे शपथपत्र दाखल आहेत. अर्जदाराने शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे मारहाण करुन घरातून हाकलून दिल्याने अर्जदार माहेरी राहते. वि.प.च्या त्रासामुळे अर्जदार ही सदर कायद्यातील संज्ञेनुसार **"व्यथित व्यक्ती"** या संज्ञेत मोडते. घरगुती जुलमाबाबत तिच्या शपथपत्रातील कथने विचारात घेता वि.प.ने तिचा मानसिक छळ करुन भावनिक दुरुपयोग केल्याचे दिसते. तसेच माहेरी गेल्यानंतर तिची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुरुपयोग केला असे सकृतदर्शनी दिसते.

१०. वि.प.नं.१ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराला अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. अर्जदाराने ही स्वत:हून तिच्या माहेरी राहत असून अर्जदार हिने पैसे उकळण्याकरिता प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी अर्जदाराने त्यांची कथने शाबीत केलेली नाहीत, त्यामुळे सदर कायदयाचा दुरूपयोग अर्जदार करीत आहेत. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही.

११. वि.प. याच्या लेखी म्हणणेत अर्जदार या सद्या त्यांचे सोबत रहात नाहीत ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे अर्जदार माहेरी गेल्यानंतर त्यांची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुर्व्यवहार केला असे सकृतदर्शनी दिसते. वि.प.नं.१ यांचे असे म्हणणे आहे की, वि.प.नं.१ याने अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून ते आजपर्यंत अर्जदाराला कोणतीही पोटगी रक्कम दिलेली नाही असे अभिलेखावरून दिसून येते.

१२. अर्जदार ही सध्या वि.प.नं.१ सोबत राहात नाही. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांना राजवर्धन नावाचा मुलगा आहे व तो सध्या वि.प.नं.१ यांच्याकडे आहे याबाबत उभयंतामध्ये वाद नाही. अंतरिम अर्जाच्या सुनावणीस अर्जदार वि.प.नं.१ सोबत राहते किंवा कसे आणि नसल्यास वि.प.ने त्यांची सोय केली अगर कसे हे पाहणे संयुक्तीक आहे. तसेच इतर आरोपांबाबत मुळ अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पुराव्यावरुन निर्णीत करण्याच्या

बाबींबाबत यावेळी भाष्य करणे न्यायोचित नाही. प्रस्तुत अर्जाच्या सुनावनीत दोन्ही पक्षांच्या उत्पन्नाबाबत ठोस पुरावा पाहण्याची आवश्यकता नाही. त्याबाबी प्रकरण चालल्यानंतर योग्य त्या पुराव्या आधारे निर्णीत करायचे आहे. सद्य परिस्थिती प्रकरण चालण्यात वेळ लागणार असलेने अंतरिम पोटगी सदर कायद्याच्या तरतुदी अन्वये शपथपत्र आधारुन मंजूर करता येतात.

१३. अर्जदार व वि.प.नं.१ यांच्यामधील नातेसंबंधाबाबत उभयंतामध्ये कोणताही वाद नाही. अर्जदार व वि.प. हे विभक्त राहत आहेत याबाबतही उभयंतामध्ये वाद नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वि.प. नं.१ हा व्यापारी असून त्यापासून त्यास रू.५ लाख उत्पन्न आहे. वि.प.नं.१ व २ यांचे काशिलिंग कन्स्ट्रक्शन या नावाने व्यवसाय असून त्यापासून त्यांना दरमहा रू.६ लाख उत्पन्न मिळते. वि.प.यांचे मालकीच्या इचलकरंजी येथे हातमागाच्या १५ जोडया असून सदर व्यवसायापासून रू.५० हजार इतके उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ व २ यांचा ५० लाख इतक्या रक्कमेचा अलिशान बंगला आहे. तसेच वि.प.नं.१ व २ यांचेकडे चारचाकी, दोन चाकी वाहने, बांधकाम व्यवसायस लागणारे अत्याधुनिक मशिन आहेत. वि.प.नं.२ यांची शेती असून त्यांना वार्षिक ३ लाख इतके उत्पन्न मिळते याबाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदाराने ऐपतीचे शपथपत्र नि.१३ ला दाखल केले आहे. त्यामध्ये वि.प. यांचे काशिलिंग कन्स्ट्रक्शन नावाने व्यवसाय असून त्याला त्यातून रू.४० लाख उत्पन्न मिळते. शहापुर येथे ५ एकर बागायत जमिन असून त्यापासून रू.२ लाख उत्पन्न मिळते व शहापूर खाणीजवळ भाडयाने ४ रूम दिल्या असून त्यापासून रू.२० हजार उत्पन्न मिळते असे नमूद केले आहे. तसेच वि.प. यांच्या नावे अनेक व्यवसाय असल्याबाबतचे कथन केलेले आहे. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. वि.प.नं.१ याने त्यांना रू.२० हजार पगार असल्याचे व त्याचेवर त्यांचा मुलगा राजवर्धन व त्यांचे आईवडील अवलंबून असून त्याचा खर्च वजा जाता त्याच्यामध्ये काही शिल्लक राहत नाही. अर्जदार

हिने वि.प. यांच्या नावे मिळकत असल्याबाबतचा अथवा त्याला मिळणा-या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वि.प.नं.१ ने अर्जदाराच्या उत्पन्नाबाबतचे कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत. तसेच अर्जदार व वि.प. यांचा मुलगा नामे राजवर्धन याचा ताबा व पालनपोषण हे वि.प. नं.१ करतात.

१४. अर्जदार जरी अर्थार्जन करीत असली किंवा तसे करण्यास सक्षम असली तरी पती या नात्याने पत्नीची संपुर्ण जबाबदारी पती या नात्याने वि.प.नं.१ यांची आहे. त्यामुळे उभयतांचे राहणीमान आणि सद्याच्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती विचारात घेता अर्जदार हीस दरमहा रुपये ३०००/- अंतरिम पोटगी तुर्तास वि.प. नं.१ कडून मिळणे न्यायिक आहे. इतर वि.प.कडून मागणी बाबत आदेश करणेसारखी परिस्थिती तुर्तास नाही. सबब, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत आहे. म्हणून मुद्दा क्र.१ मी त्यानुसार निष्कर्षित आहे. सबब आदेश-

## आदेश

१. अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

   अ. सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दिनांक ०६/११/२०२५ पासून वि.प.नं.१ याने अर्जदार हिस दरमहा रू.३०००/- (अक्षरी तीन हजार रुपये मात्र), सदर कायद्याचे कलम २०(ड) अन्वये अंतरिम पोटगी पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

२. खर्चाबाबत अंतिम निर्णयावेळी आदेश करण्यात येईल.

३. सदर आदेशाच्या प्रती सदर कायद्याचे कलम २४ अन्वये संबंधीतांना विनाशुल्क देण्यात याव्यात.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.04.24 16:27:36 +0530

**(डी.बी.साठे)**

दिनांक- २४/०४/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.